**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
***Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.49366, NOV-DEC 2017, VOL- 4/37*

# त्रिरश्मी लेणी : सामाजिक, वाड्मयीन महत्त्व

**प्रा. माधवी खरात ,.** M.A., **Ph. D.**

*श्री. शाहू मंदिर महाविद्यालय पर्वती, पुणे*

***Abstract***

*अश्मयुग, ताम्रयुग व लोहयुग हे मानवी प्रगतीचे तीन ठळक विशेष आहे. अगदी प्राचीन काळापासून मानव शिकार, शेती करुन जगत होता. ताम्रयुगात अग्निचा शोध लागला आणि मातीची भांडी, घरे इत्यादींची निर्मिती झाली. मानवी समाजाच्या प्रगतीची सुरुवात झाली. समूह, समाज, प्रांत, देशाची निर्मिती झाली. तत्पूर्वी शेतीतून निसर्ग, डोंगर दऱ्या, नदी, सागर, आकाश इत्यादीबद्दल कुतुहल जागृत होवून मिळालेले ज्ञान, माहिती साठवून ठेवण्याच्या इच्छेतून डोंगरावर छिन्नी, हातोडा मारुन, मंदिरे, लेणी, गुहा निर्माण करण्यात आल्या. मखडकात कोरलेल्या अद्भूत मानवी कारगिरीचा नमुना म्हणजे लेणीफ भारतता १२०० लेणी आहेत पैकी १००० लेणी महाराष्ट्रात आहेत. पैकी ९०० लेण्या बौद्ध लेण्या म्हणून ओळखल्या जातात. सम्राट अशोकाच्या काळात लेण्या खोदल्यास प्रारंभ झाला. भाजे. कोंडाणे, पितळखोरे, अंजिठा, बेडसे, कार्ले इत्यादी ठिकाणी लेण्या आहेत. सर्वसाधारण इ.स. पूर्वी ३ रे शतक ते इ.स. १२०० वे शतक असा, लेण्यांचा कालखंड दिसतो. प्रस्तुत लेखात नाशिकमधील त्रिरश्मी लेण्यांचा विचार करण्यात आला असून लेण्याची रचना, कार्यकाल, लेण्यामधील लिपी, व्यक्ती, प्राणी, कलाकुसर, अंर्तभाग, बर्हिभाग, बुद्धमूर्ती, चैत्यगृहे, स्तूप इत्यादी आधारे तत्कालीन सामाजिक, वाड्मयीन बाबीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी ऐतिहासीक संशोधन पद्धतीच वापर केला आहे.*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र हे संपन्न राष्ट्र आहे. ममहान राष्ट्र ते महाराष्ट्रफ असे महाराष्ट्राबद्दल म्हटले आहे. महाराष्ट्राला सह्याद्री पर्वतांचे, गडांचे, लेण्यांचे वरदान लाभले आहे. महाराष्ट्राच्या इतिहास व लोकसंस्कृतीची ओळख ही प्राचीन स्थळे, मंदिरे, गड, किल्ले, लेण्या. शिलालेख, ताम्रपट, नाणी, उत्खनात सापडलेली भांडी खापराच्या वस्तु, यातुन होत गेलेली आहे. प्रस्तुत लेखाचा विषय त्रिरश्मी लेणी– सामाजिक वाड्·मयीन महत्त्व असा असून नाशिकमधील ही लेणी पांडव लेणी म्हणून ओळखली जाते. एकूण लेखाचा विचार लेण्यांचे १) बहिरंग २) अंतरंग ३) सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ ४) वाड्·मयीन संदर्भ इत्यादी मुद्यांच्या आधारे केलेले असून अखेर निष्कर्ष नोंदवले आहेत.

**लेणी :**

मडोंगराचा दर्शनी भाग कोरुन त्यात तयार केलेली गुंफा म्हणजे लेणी.फ लेणं म्हणजे मगुहाफ किंवा मगुंफाफ मशैल्यगृहफ इत्यादी नावाने ओळखली जाणारी रचना. अश्मयुगात मनुष्य गुहेत राहत होता. एकाकी मनुष्याने पशुपक्ष्यांच्या संगतीत, निसर्गाच्या सानिध्यात शेतीच्या सहवासाने, आजुबाजूची सारी संवेदना छिन्नी हातोड्यांच्या सहाय्याने डोंगरावर खोदली व त्यातुन सुरूवातीला ओबडधोबड कलाकृती, शिल्पकृती मानव, प्राणी, पक्षी, निसर्गाचे रुप चितारले गेले. हळूहळू मानवी कल्पना बुद्धी, कौशल्याचा विकास झाला व लेणीची सुबकता आकाराला आली.

बौद्ध भिक्षू एकांतवासात राहत, निसर्गाच्या कुशीत, एकाकी अवस्थेतील ध्यानधारणेतूनही डोंगरातून लेणी कोरली गेली. बौद्ध लेण्याचा कालखंड पाहिला तर मौर्य काळात, राजा अशोकाने (इ.स. पूर्व २४३–२३२) बौद्ध लेण्या खोदण्यास प्रारंभ केला. अशोकाने मगध, देशात बराबर टेकड्यांवर व त्याचा नातु दशरथ याने नार्गाजून टेकड्यावर लेणी कोरली. वैदिक, हिंदू जैन लेण्याही आढळतात. महाराष्ट्र, कर्नाटक, तामीळनाडू, मध्यप्रदेश इत्यादी ठिकाणी लेण्या आढळतात.

**बौद्ध लेणी :**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

बौद्ध लेण्यात चैत्य, स्तुप, विहार असे प्रकार आढळतात. महाराष्ट्रातील कातळ, (दगड) हा अधिक भक्कम असल्याने लेण्या महाराष्ट्रात अधिक आहेत. सातवाहनापासून यादवांपर्यंत लेण्या कोरण्याचे काम चालू होते. महियानफ या संप्रदायाने प्रथम लेणी कोरली. पुढे ममहायानफ संप्रदायानेही लेणी कोरण्यास प्रारंभ केला. स्तूपयुक्त मचैत्यगृहेफ व मविहीरफ यांचा हियान लेण्यात समावेश होतो. गौतमबुद्ध व त्यांचे शिष्य यांच्या अस्थी अवशेषांवर हे स्तूप उभारले जातात. स्तूप ज्या ठिकाणी त्यांना मचैत्यगृहेफ म्हणतात. भिक्षूंचा निवासाला मविहारफ म्हणतात. ३ ऱ्या शतकापूर्वीच्या काही लेण्यात, लाकूड व विटांचे प्रमाण असे. सांची, पवना, अमरावती इत्यादी ठिकाणी हे आढळते. ममहायानफ पंथाच्या लेण्यात स्तूप, चैत्यगृहे असतेच. पण, त्यावर बुद्धाची उभी मूर्ती असते. मपद्मपाणीफ, मताराभृकुणीफ, ममहामायरीफ इ. बोधीस्तव व बोधिशक्ती यांच्या लहान प्रतिमा असतात. बौद्ध लेण्यात ममैत्रेयफ मज्ञानकेतूफ ममंजूश्रीफ महेरितीफ मजांभोळफ इत्यादी प्रतिमा असतात.

**महाराष्ट्रातील बौद्ध लेण्या:**

महाराष्ट्रातील लेण्यांच्या संख्येवरुन प्राचीन काळात बौद्धधर्म किती लोकप्रिय होता हे, दिसून येते. कुडा, महाड, बेडमा, कार्ला, नाशिक, पितळखेरे जुन्नर, अमरावती, कान्हेरी पौनी स्तूप आहेत. बौद्ध धम्माच्या शांती अहिंसा तत्त्वाच्या पालनाने सातवाहनकालीन सामाजिक सांस्कृतिक जीवन स्थीर होते व त्यातूनच कलेची भरभराट झाली असण्याची शक्यता आहे.

**नाशिकमधील त्रिरश्मी लेणी:**

सद्यकालीन नाशिक शहराला आधुनिक शहराचे स्वरुप प्राप्त झाले असले तरी, रामायण, महाभारत काळापासूनच नाशिकचे ऐतिहासिक, धार्मिक महत्त्व आहे. पंचवटी काळाराममंदिर, तपोवन, सोमेश्वर मंदिर, त्र्यंबकेश्वर गंगापूर धरण वगैरे गोष्टींनी समृद्ध असणाऱ्या नाशिकचा मपांडव लेणीफ एक महत्त्वपूर्ण घटक आहे. आख्यायिकेनूसार पांडवांनी एका रात्रीतून ती तयार केली अर्थात, अलिकडच्या काळातील संशोधनानूसार ती मपांडवफ लेणी नसून मपंडूफ लेणी होती. मपंडूफ म्हणजे पीतवस्त्र नेसलेल्या लोकांनी निर्माण केलेली लेणी, हे मपीतवस्त्रधारीफ लोक म्हणजे मबौद्ध भिक्षूफ असून अनेक काळ त्यांचे वास्तव तीन डोंगरांच्या मधून, उगवणाऱ्या सूर्याच्या ठिकाणी होते. त्यातून मत्रिरश्मी लेण्याफ असे या लेण्यांना नाव मिळाले. मात्र पुढे मपंडूफ चा अपभ्रंम होवून मपांडवफ शब्द आला व पांडव लेणी हे नामनिधान प्राप्त झाले. या शोध निबंधात त्रिरश्मी हाच शब्दप्रयोग केलेला आहे.

नाशिकमध्ये या बौद्ध लेणी शिवाय मचामरलेणीफ, किंवा मचांभार लेणीफ जी जैन साधू भदारक क्षेपंदकिर्ती यांनी नाशिकमधील ममसरूळफ येथे धर्मशाळा बांधली, तेव्हापासून ही लेणी उजेडात आली. तीर्थकारांच्या मूर्ती व आजुबाजूला सेवक, स्तंभावरील कोरीव काम व आदिनाथाच्या मूर्तीभोवती २१ कोनाडे, असे त्याचे स्वरुप आहे. तसेच अंकाई–टंकाई हा किल्ला असून येथेही जैन मुनींनी व्यापाऱ्यांनी ९०० ते ११०० या काळात या लेण्या खोदल्या असल्याचे म्हटले जाते. तीर्थकारांच्या मूर्ती, अंबिकेची मूर्ती असे याचे स्वरुप आहे.

**त्रिरश्मी लेणींचे सामाजिक महत्त्व:**

एकूण २४ लेण्यांचा हा कलासंपन्न असा देखणा समुदाय आहे. सातवाहनांपासून यादवांपर्यंतच्या कालखंडातील ह्या खोदकामात तत्कालीन समाजव्यवस्थेचे प्रतिबिंब उमटलेले आढळते. वेगवेगळ्या शतकातील मूर्त्या, आजुबाजूचे सेवक, दासदासी, फुले–पाने, नक्षीकाम वरील मूर्त्या, बुद्धाच्या मूर्तीतील कमालीचा शांत, स्नेहपूर्ण करुणामयी भाव चितारणाऱ्या कलावंताच्या कलासंपन्न त्याचबरोबर शांत प्रसन्न वृत्तीचे, गुणांचे दर्शन घडवते. वेगवेगळ्या कालखंडातील सामाजिक–राजकीय जीवनातील संपन्न, सुसंस्कृतपणामुळेच ही स्थिरता प्राप्त होवू शकते. तत्कालीन समाज कलाप्रेमी तसाच ज्ञानसंपन्न होता. कारण वास्तुशास्त्र, तंत्रमितीचा अभ्यास हा खोलवर होता हे जाणवते. खोदण्यासाठी वापरण्यात आलेला दगड, जमिनीपासून डोंगराच्या उंचीचा विचार, लांबी, रुंदी क्षेत्रफळाची सखोलता, ही आधुनिक तंत्राएवढीच असल्याचे जाणवते. लेण्यातील स्त्री शिल्पावरुन तत्कालीन स्त्रिया शिक्षित, अभिरुचीसंपन्न, कलाप्रेमी व स्वतंत्र व्यक्तीमत्त्वाच्या होत्या असे म्हणता येते. स्त्रीवेशभूषा, केशभूषा तसेच जत्रा यात्रेतील तिचा गवाक्षातून पाहण्याचा किंवा गर्दीतील सहभाग हे

स्पष्ट दर्शविते. तसेच लेणी ३, १०, १२, १४, १७ इत्यादीवरील शिलालेख पाहता, पती, पुत्र यांच्या नावाने लेण्यांना दानधर्म करण्याइतपत स्त्रिया सधन, स्वतंत्र व सुसंस्कृत होत्या असे म्हणता येते. बुद्धमूर्त्यांची रेखिवता व वेदिकवरील यक्षी किंवा नर्तकीच्या प्रतिमा, त्यांचे पृष्ठ स्तन, बारीक कंबर, अलंकृत शरीर विशाल नितंब इ. मथुराशैलीतील खोदकाम आढळते. बुद्धाची मूर्ती गांधारशैलीतही आढळते. वास्तव रुप वाटावे, इतके शरीराचे अवयव, स्नायू, उत्कट भाव, बोटांच्या मुद्रा, कपाळावरील भव्यता जिवंत आहे. रक्षकांच्या अंगावरील वत्स्राची सळसळ, कमरेला बांधलेल्या घट्ट वस्त्राची गाठ, खाली सोडलेला काठ इत्यादीचे शिल्प अप्रतिम आहे. लेण्यांना व्यापारी, भाविक, सधन नागरिक, भूतकालीन राजांच्याकडून भरपूर दानधर्म होणे हे आर्थिक, सामाजिक, संपन्न समाजाचे लक्षण म्हणता येईल. तत्कालीन समाजाची उच्च अभिरुची व कलासंपन्नता तसेच तसेच कलाशास्त्राचे ज्ञान ठळक होते. लेण्यांच खोदकाम अत्यंत कौशल्यपूर्ण आहे. निरीक्षण, कारागिरीतील सातत्य वर्षानुवर्षे घेतलेल्या शिक्षणातून येणारी सुबकता स्पष्ट होते. लेण्यातील मूर्ती, स्तंभशीर्ष, वेदिका, गवाक्ष, स्तूपाची रचना बौद्धभिक्षू, शयनकक्ष, धामपठनाचे कक्ष, पाणपोई, फुलपान, पक्षी नक्षीकाम, स्त्रीपुरुषाचे चेहरे, सामान्यजन, राजे–महाजन, नर्तिक इत्यादींचे शिल्प अप्रतिम आहे. एकाच लेण्यांतील विविध आकाराच्या, पण समान भाव व्यक्त करणाऱ्या, बुद्धमूर्तीतील सारखेपणा इत्यादीचे अत्यंत बारकाईने केलेले रेखाटन, गवाक्षरचना सूर्यदर्शन खेळती हवा, पाऊसथंडीपासून बचाव, इत्यादीची केलेला विचार हा ज्ञानसंपन्न कलाभिरुचीचे दर्शन देतो. तत्कालीन ग्रामव्यवस्था व नगरव्यवस्था ही समतावादी आधुनिक लोकशाही प्रमाणे होती, अनेक शिलालेखातून नगरप्रमुख किंवा व्यवस्थापकाच्या अधिकाराची जाणीव स्पष्ट होते. एकूणच वर्षानूवर्षाच्या लेण्याच्या निर्मितीतील संपन्न, समतावादी, बौद्धधर्माच्या प्रभावाखाली समाज स्पष्ट होतो.

**वाङ्मयीन महत्त्व:**

सातवाहनांची बौद्ध धम्माच्या प्रसाराला उदार हस्ते मदत केल्यामुळेच लेण्यांचे खोदकाम मोठ्या प्रमाणात, वर्षानूवर्षे चाललेले आढळते. नाशिक ह्या व्यापारी केंद्रावरुन भडोच कडे जाणारे रस्ते असल्याने, व्यापाऱ्यांचे, नाशिक हे निवासाचे स्थान होते. व्यापाऱ्यांना गोदामे म्हणून तसेच तात्पुरता निवास म्हणून लेण्या उपयुक्त होत्या, त्यातूनच लेण्यांच्या निर्मितीला त्यांची मदत मिळत असे. सातवाहन, क्षातप यांच्या काळातील लेण्या महिनयानफ पंथाच्या तर, पुढील काळातील ममहायानफ पथांच्या आहेत. भट्टपालिक, गौतमीपुत्र सातकर्णी, शिशुपुम पुल्लभट्टीशी, सातवाहन राजा, क्षारपांचे दोन राजे, दक्षमित्रा व उषदंत यांनी दहाव्या लेण्यांच्या कोरीव कामात मदत केल्याचा उल्लेख शिलालेखात आहे.

नाशिकमधील लेण्यातील शिलालेखावरुन, तत्कालीन वाड्मयीन संदर्भ प्राप्त होतात. बौद्ध धर्मिय आचार्य नागार्जून हे सातवाहक नृपती यज्ञश्रीच्या समकालीन होता. त्याकाळात, प्राकृत भाषेत बौद्ध, जैन, वैदिक साहित्य निर्माण झालेले आढळते. पाली भाषेला बौद्ध काळात स्थान होते. अध्ययन, अध्यापन होत असे ब्राह्मी लिपीतूनच हे शिलालेख आढळून येतात. व्यवहारात मपालीफ व इतर प्राकृत भाषा मअर्धमागधीफ मपैशाचीफ शौरसेनी इत्यादी भाषा उपयोगात होत्या, नार्गाजून हा बौद्ध विद्वान पंडीत आदरणीय होता. त्याने मसुन्हुलेखनफ हा तिबेटी भाषेत ग्रंथ लिहिला. याशिवाय इतरही लेख ग्रंथ लिहिले. राजा अशोकाने ८४ हजार स्तूप निर्माण केले. यातून लिपीचा बोध होतो. अनेक शिलालेख हे खरोष्टी, ग्रीक, अरेमीएक लिपीत तर काही, ब्राह्मी लिपीत आहेत. नाशिकमधील शिलालेखातून, बौद्ध धर्मपंडीताचा व्यासंग, बौद्ध धम्माचे तत्कालीन स्थान, व समाज जीवनातील वाड्मयप्रेमी वृत्ती दिसून येते. भारतीय लिपींचीक जननी म्हणजे ब्राह्मी लिपी असे म्हटले जाते. अशोकाचे काही लेख तसेच, नाशिकमधील लिपी ही ब्राह्मीत आहे.

**नाशिकमधील त्रिरश्मी लेणीतील शिलालेख:**

शहरात खखरात– छहरत, या घराण्याचे राज्यकर्ते, तक्षशीला, मथूरा या भागातील होते. क्षहरात सत्रपांपैकी नहपात हे श्रेष्ठ सत्रप (राजे) होते. त्यांचे उल्लेख ७ शिलालेखात आहे. ४१, ४२ व ४५ लेण्यामध्ये त्यांच्या दानशूर व लढवैय कारकीर्दीबद्दल लिहिले आहे. नाशिकमधील ७ शिलालेखात ऋषभदत्त याच्या जावयाच्या दानधर्माचा उल्लेख येतो. नहपान हे पर्शियन होते, परंतु त्यांची क्षहरात

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

जमात ही मशकफ वंशातून झालेली होती. नहपान चा जावई ऋषभदत्त स्वतःला शक म्हणून घेत असे, या घराण्यांच्या मशकफ राजावरुन इ.स. पूर्व ७८ च्या कालगणनेला मशकफ कालगणनेनूसार निर्देश दिले असल्याचे अनुमान आहे.

त्रिरश्मी लेण्यातील ९ वे लेणे ब्राह्मी लिपीत असून सातवाहन राजा कृष्ण याच्या काळात हे लेणे कोरले आहे. त्यावरील शिलालेखात हे लिहिले आहे. २ रे लेणे भटपालिका नावाच्या स्त्रीने तिरण्या पर्वतात कोरलेले चैत्य पूर्ण केल्याचे सांगणारा शिलालेख आहे. भटपालिका ही राजामात्याची कन्या व राज्याधिकारी अगियत गक याची पत्नी मालोसीरीची नात होती. ३ रा लेख हा गौतमीपूत्र सातवर्णी, यांचा असून गोवर्धन येथील विजयी सेनेच्या शिबिरातून काढलेल्या आज्ञेसंबंधी आहे ही आज्ञा, गोवर्धन येथील आमात्य विष्णूफलीत याला उद्देशून आहे. तसेच गौतमीपुत्र व त्याची माता महादेवी यांनी दिलेल्या आज्ञा, जमिनीच्या सूचना आहेत तसेच काही शिलालेखात, आई–वडील व बहिणीस पुण्य मिळावे म्हणून लेण्यास दानधर्म केल्याचा उल्लेख आहे, तर राजा पूलुमायी, त्याची आई महादेवी बलश्री यांनी बौद्ध भिक्षूंसाठी केलेल्या दानाचा उल्लेख आहे. एका शिलालेखात गोवर्धनाच्या अधिकाऱ्याने सुदर्शन व श्यामली पद्र ही गावे भिक्षूसंघाला दान दिल्याचा उल्लेख आहे. राजा सातकर्णीच्या काळातील एका लेखात, कौशिक गोवी येथील सरदार, महासेनापती भवगोपी याच्या पत्नीने वासु हीने भिखूसंघाला दिलेल्या दानाचा उल्लेख आहे.

थोडक्यात नाशिकमधील त्रिरश्मी लेणीतील शिलालेखातून तत्कालीन समाजाचा दानशुरपणा, सुसंस्कृतपणा तसेच कलाप्रेम, वाङ्मयप्रेम, ग्रंथ रचनेसाठी दिलेले उत्तेजन, अनेक भाषांना दिलेले प्रोत्साहन आणि राजा, सरदार, धनिक स्त्रिया राजस्त्रियांचा सामाजिक जीवनातील सहभाग, तत्कालीन समाजाची उच्च अभिरुची स्पष्ट करतो.

मत्रिरश्मी लेणीफ बराच काळ दुर्लक्षित होती. २००१ साली स्थापन झालेल्या नाशिक येथील मबौद्ध प्रसारक मंडळानेफ या लेण्याच्या दुरव्यवस्थेकडे प्रथम वेधले. सरकारच्या पुरातत्व विभागाशी (अर्कीओलॉजी, सर्वे ऑफ इंडिया) पत्रव्यवहार करुन, रक्षकाची नेमणूक करणे, पायऱ्याची व्यवस्था, फलकलेखन, तटबंदी, कठडे करणे इत्यादी कामे केली आहेत. तसेच प्राचीन ब्राह्मी, खरोष्टी, नेवारी, शारदा व गांधारी या लिपीतील बौद्ध साहित्याचे अध्ययन व अध्यापनाचे कार्य सुरूकेल्याने त्रिरश्मी लेणीचे महत्त्वपूर्ण स्थान अधोरेखित झाले आहे.

थोडक्यात–नाशिकमधील त्रिरश्मी लेणींच्या अभ्यासातून प्राचीन काळाच्या सामाजिक वाड्·मयीन सांस्कृतिक पैलूंवर प्रकाश पडतो.

१) प्राचीन सातवाहन ते यादव राजाच्या कारकींदत संपन्न होती. संपन्न, कलाप्रेमी, धर्मप्रेमी वाड्·मयीप्रेमी असे हे राजे होते.

२) व्यापार उद्यीम तसेच अर्थव्यवस्था मजबूत होती भडोचचा प्रवास, जुन्नर, नाशिक, मार्गे होत असल्याने तेथील उंच डोंगर कड्यांचा आधारे, लेण्यांचा खोदकामास व्यापार वाढीसाठी उत्तेजन.

३) स्त्रियांचे स्थान समानतेचे होते. अनेक राजांनी आई, पत्नी बहिणींना आर्थिक स्वातंत्र दिलेले आढळते, तर एका शेतकऱ्याने पत्नीच्या स्मरणार्थ लेणे खोदले, याचा अर्थ कुटुंबव्यवस्था भक्कम व आदर आणि सौख्यपूर्ण संबंधावर आधारित होती.

४) ब्राह्मी, खरोष्टी, गांधारी वगैरे लिपींना प्रोत्साहन, त्यामुळे गाथाकथन धम्मदेशनेतून वाड्·मयीन उत्तेजन

५) सामाजजीवनात, शिक्षण, वाङ्मय कला, अर्थ, धर्म यांना अनुकूलत, सामाजिक, राजकीयदृष्ट्या संपन्नता तसेच कारागीरीचे शिक्षण उच्च कोटीतील होते.

६) सदाभिरुचीसंपन्न राजे, वैदिक धर्मीय राजांनी राज्याच्या प्रजाहित दक्षतेतून, सवतःच्या इच्छेने बौद्ध लेण्यास उत्तेजन दिले व धार्मिक समभाव राखला.

**संदर्भ** :

*म.श्री. माटे मअतिताची लेणीफदेशमुख आणि कंपनी, २००६*
*प्रा. सु. ह. जोशी ममहाराष्ट्रातील लेणीफ डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०११*
*अ. रा. कुलकर्णी मप्राचीन भारत–संस्कृती आणि इतिहासफ स्नेहवर्धन, पुणे*
*डॉ. शोभना गोखले मभारताचे संस्कृती वैभवफडायमंड, पुणे २००९*
*लेणी आभ्यासक अतुल भोसेकर–अध्यक्ष मबौद्ध साहित्य प्रसारक मंडळफ नाशिक यांच्याशी केलेली चर्चा.*